Literacy for a Billion

Movie: Bhagyalakshmi
Year: 1962

Song: Talmalto me ethe tujvin
Lyricist: Shanta Shelke

आ...
तळमळतो मी इथे तुझयाविन
शून्य जाहले अवघे जीवन
शून्य जाहले अवघे जीवन
शून्य जाहले अवघे जीवन

गीत उमलले माझ्या ओठी
गीत उमलले माझ्या ओठी
गाइलेस तू ते मजसाठी
आ...
गाइलेस तू ते मजसाठी
जुळता जुळता रेशीमगाठी
जुळता जुळता रेशीमगाठी
तुटले अवचित कोमल बंधन
शून्य वाटते अवघे जीवन
शून्य वाटते अवघे जीवन

माळ ओघळे फूल ओविता
कवन भंगले शब्द गोविता
कवन भंगले शब्द गोविता
स्वप्न लोपले बघता बघता
स्वप्न लोपले बघता बघता
असह्य आता हे जागेपण
हे जागेपण
हे जागेपण
आ...
कळे मला ही तुझी वेदना
कळे मला ही तुझी वेदना
साद परी मी देऊ शकेना
साद परी मी देऊ शकेना
झाले गेले विसर साजणा
विसर साजणा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*